# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५०/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शिवाजी बाबासो आटपाडकर,<br>मु.पो. सिंगनहळ्ळी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवाजी बाबासो आटपाडकर, मु.पो. सिंगनहळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहक यांनी आपली शेत जमीन गट क्र. ६१९ येथे ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज करुन दि. २५.४.२०११ रोजी रु. ४०५०/- पावती क्र. ८७३८३१४ नुसार भरले आहेत व चाचणी अहवाल त्याचदिवशी दिला आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने त्यांना दि. २४.७.२०११ पर्यंत वीज जोडणी देणे आवश्यक होते, ही वीज जोडणी आजतागायत मिळाली नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १८.८.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ५.११.२०११ रोजी आदेशझाले. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंबाची निश्चिती झालेनंतर कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत दि. २८.१२.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल दाखल केला नाही. वि.प.ने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने त्यांच्या नवीन शेतीपंप कनेक्शनसाठी दि. २५.४.२०११ ला चलन भरल्याचे मान्य केले व त्याच दिवशी चाचणी अहवाल दिल्याचे म्हटले आहे . एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतची कामे मार्च २०१२ पर्यंत करण्याचे उद्दीष्ट आहे.ही कामे झाल्यानंतर अर्जदार ग्राहकाचे काम जेष्ठता यादीनुसार पूर्ण करण्यात येईल. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ग्राहकाचे ५ पोलचे ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. कंपनीच्या उद्दीष्टाप्रमाणे एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतच्या paid pending अर्जाची कामे मार्च २०१२ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. तक्रारदार ग्राहकाचा अर्ज एप्रिल २०११ मधील असल्याने ही कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांना वीज जोडणी देण्यात येईल असे सांगितले. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज पुरवठा करण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळणेसाठी दि. २५.४.२०११ ला चलन भरल्याचे व चाचणी अहवाल त्याचदिवशी वितरण कंपनीकडे दिल्याचे मान्य आहे. वितरण वाहिनी विस्तार असलेने कृती मानके विनियमानुसार ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते, ती दिलेली नाही.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वि.प.चे स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार कंपनीच्या उद्दीष्टांच्या किंवा परिपत्रकाच्या अनुषंगाने मार्च २०११ पर्यंतचे paid pending अर्जदारांना प्राधान्याने विद्युत पुरवठा देणार व प्रस्तुत अर्जदार ग्राहकास मार्च २०१२ नंतर जेष्ठतायादीनुसार देणार असे सांगितले आहे. प्रत्यक्षात किती अर्ज या विभागात या लाईनवर विद्युत पुरवठ्यासाठी प्रलंबित आहेत या बाबत कोणतीही आकडेवारी वि.प.ने दिलेली नाही. असे असले तरी, ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ८.२ नुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला मंच करु शकतो.

Rule ( 8 ) : <u>Findings of the Forum</u>
8.2 : If, after the completion of the proceedings , the Forum is satisfied after voting under Regulation 8.1 that any of the allegations contained in the Grievance is correct, it shall issue an order to the Distribution Licensee directing it to do one or more of the following things in a time bound manner, namely -
(a) to remove the cause of Grievance in question ,
(e) any other order, deemed appropriate in the facts and circumstances of the case.

क्षणभर वि.प.चे परिपत्रक किंवा उद्दीष्ट मार्च २०११ पर्यंतच्या paid pending अर्जदारांना प्राधान्याने विद्युत पुरवठा द्यावा असे आहे हे गृहीत धरले तरी, अर्जदाराचा एप्रिल २०११ मधील नवीन वीज जोडणीसाठीचा अर्ज आहे आणि वितरण कंपनीचे उद्दीष्ट किंवा वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रकामुळे Standards of Performance व त्यातील तरतुदीचा भंग करण्याचा किंवा ते दूर्लक्षित करण्याचा अधिकारी निश्चितपणे वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांना किंवा नोडल ऑफीसरना नाही, त्यामुळे ' प्राधान्यक्रम ' या म्हणण्याला कांही अर्थ नाही. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनीने संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि. ३०.४.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु करावा, तसा अहवाल मंचास द्यावा.
३) ग्राहक विलंबापोटी भरपाई स्वतंत्ररित्या वि.प. विरुध्द मागू शकतो.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

**४)** सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com